जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २१.०५.२०२५**

दिनांक १९/०५/२०२५ रोजी २२:३० वा.चे सुमारास फिर्यादी श्री.सुधिर विष्णू कोकाटे हे त्यांच्या मित्रांसोबत सुव्रत अपार्टमेन्ट, टेंभी नाका, ठाणे येथील नवरात्र कार्यालयासमोर कामानिमित्त बसले असता मागील जुन्या वादातून आफरीन खान या महिलेने व तीच्या सोबत असलेल्या एका इसमाने फिर्यादी व त्यांच्या मित्रांवर चॉपर सारख्या हत्याराने हमला केला. सदर हमल्यात फिर्यादी यांचे मित्र गजानन म्हात्रे यांच्या पाठीवर व डाव्याहाताच्या दंडावर चॉपरचा वार झाल्याने ते जखमी झाले होते.

सदर घटनेबाबत ठाणेनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं ३८०/२०२५ कलम ११८(२), ३५१(३), ४९,३(५), सह भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ कलम ४,२५ प्रमाणे दिनांक २०/०५/२०२५ रोजी ०२:५६ वा दाखल गुन्हा दाखल केला आहे व सदर गुन्ह्याचा तपास ठाणेनगर पोलीस स्टेशन करीत असुन, आरोपींचा शोध चालु आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर.